ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-II Feb. 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# "अल्पभूधारक शेतक—यांच्या अनुदानित मराठी मांध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळतीच्या समस्यांचा अंभ्यास"

**श्री.प्रदीप निवृत्तीराव करंजीकर**

सहायक प्राध्यापक

अभिनय अद्यापक माहाविद्यालय,लातूर

## I)प्रस्तावना :—

भारताला प्राचीन परंपरा लाभलेली असून वैदिक काळापासून शिक्षणाची परंपरा गुरूकूल शिक्षण पध्दतीच्या रूपाने अस्तित्वात होती.पुढे तक्षशिला व नालंदा विद्यापीठाच्या रूपाने शिक्षणाने रूजण्याचे व विस्तार घेण्याचे काम केले. मुघल सत्तेच्या काळातही मक्तबा व मदरसाच्या माध्यमातून धार्मिक शिक्षण देण्यात येत होते. स्वातंञ्यापुर्वी १५० ते २०० वर्ष इंग्रजांनी राबविलेली शिक्षण पध्दती अस्तित्वात होती. स्वातंञ्यप्राप्तीनंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशातील ६० टक्के ते ७० टक्के ग्रामिण भागात राहणारी लोकसंख्या डोळयासमोर ठेवून इ.सन १९५५ मध्ये कृषि ,उद्योग व व्यापार,तसेच शिक्षण इ.क्षेत्रातील विकास डोळयासमोर ठेवून पहिली पंचावार्षिक योजना मांडली व पुढील काळात ती यशस्वी सुध्दा झाली.शिक्षणाच्या बाबतीत इ.सन १९५२ मध्ये मुदलीयार आयोग स्थापन करून शैक्षणिक प्रगती साधण्याचा प्रयत्न केला. १९६४ मधील कोठारी आयोग तसेच १९८६ मधील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व कृती कार्यक्रम याव्दारे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करून शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी व्यापक प्रयत्न करण्यात आले.भारतीय संविधानातील विविध शैक्षणिक तरतूदीनुसार देशातील प्रत्येक मूल शिकले पाहिजे. या द्रुष्टिकोणातून "सर्व शिक्षा अभियान"सुरू करून विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके व माध्यान्ह भोजनाची तरतूद करण्यात आली. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानातूनही शिक्षणाला बळकटी प्राप्त करून देण्यात आली.अनेक धोरणात्मक योजना राबविल्याने १४ वर्षापर्यंतच्या सर्व मुला—मुलींना सार्वत्रिक,सक्तीचे व मोफत शिक्षण दिले जात आहे.

आर्थिकदृष्टया दूर्बल घटकातील मुलांना शिष्यवृत्ती,पाठयपुस्तके व इतर शैक्षणिक साहित्याचा मोफत पुरवठा केल्याने या घटकांतील मुलांना त्याचा फायदा होत आहे. अनेक शैक्षणिक योजना दुर्दैवाने गावपातळीपर्यंत यशस्वीपणे न राबविल्याने अनेक समस्या निर्माण होत आहेत.अल्पभूधारक शेतक—यांची मूले बिकट व हलाखीची परिस्थिती तसेच आर्थिक संटामूळे शिक्षणापासून वंचित रहाण्याचा धोका निर्माण झाला आहे. अल्पभूधारक शेतक—यांच्या कुटूंबामध्ये अद्यापही शैक्षणिक वातावरण योग्यपणे विकसित न झाल्यामुळे संशोधकाने संशोधनासाठी माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कशा पध्दतीने कमी करता येईल? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी संशोधन व्हावे असे संशोधकाला वाटते समाजामध्ये समानता निर्माण करण्यासाठी तसेच अल्पभुधारक शेतक—यांची मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहू नये यासाठी माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळकतीच्या समस्यांचा अभ्यास संशोधन करणार आहे.

## II) संशोधनाची गरज :–

१) अल्पभूधारक शेतक–यांची संख्या जाणून घेण्याच्या दृष्टीने.

२) अल्पभुधारक शेतक–यांच्या पाल्यांची संख्या जाणून घेण्याच्या दृष्टीने.

३) अल्पभूधारक शेतक–यांच्या पाल्यांची शाळेतील गळतीच्या समस्यांची कारणे शोधण्याच्यादृष्टीने.

४) ग्रामिण भागातील अल्पभूधारक शेतक–यांचा प्रमूख व्यवसाय शेती असल्याने शेतीचे उत्पादन अत्यंत कमी झाल्यास त्याचे परिणाम विद्यार्थ्यावर होतात.

## III) संशोधनाचे महत्व :–

अल्पभूधारक शेतक–यांच्या मराठी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळतीच्या समस्येचा अभ्यास केला जाणार असल्याने.गळतीच्या समस्येचा अभ्यास करीत असताना नेमकया कोठल्या अडचनी उद्‌भवतात यामूळे.अनुदानीत मराठी माध्यमाच्या शाळेतील इ ९ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांना,शाळा व शिक्षकांना,अल्पभूधारक शेतक–यांना व समाजाला या संशोधनाचा उपयोग होणार आहे म्हणून तसेच या समस्येशी साध्यर्म्य असणा–या इतर विषयांवर संशोधन करणा–या इतर अनेक संशोधकांना फलदायी आहे म्हणून वरील विषयावर संशोधन होणे महत्वाचे आहे.

## IV) संशोधन समस्येचे शीर्षक :–

**“अल्पभूधारक शेतक–यांच्या अनुदानित मराठी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळीतीच्या समस्यांचा अभ्यास.”**

## VI ) संशोधनाची उद्दिष्टे

१) अल्पभूधारक शेतक–यांच्या मराठी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या गळतीच्या समस्यांचा शोध घेणे.

२) गळीतच्या समस्यांच्या कारणांचा शोध घेणे.

३) गळतीच्या समस्येच्या निराकरणासाठी योग्य उपाय योजना सुचविणे.

४) सूचविलेल्या उपाययोजनांची परिणामकारकता अभ्यासणे .

## VII) गृहितके

१) अल्पभूधारक शेतकरी प्रामुख्याने अशिक्षित असल्याने माध्यमिक स्तरांवरील पाल्यांना अनेक अडचणी जाणवतात.

२) अल्पभूधारक शेतकरीच स्वत: निरक्षर असल्याने ते आपल्या पाल्यांना स्वत: शैक्षणिक मार्गदर्शन करू शकत नाहीत. परिणामी विद्यार्थ्यांना अनेक शैक्षणिक अडचणींना सामोरे जावे लागते.

३) अल्पभूधारक शेतक—यांचे वार्षिक उत्पन्न कमी असल्याने ते आपल्या पाल्यांना आवश्यक शैक्षणिक सुविधा योग्य प्रमाणात उपलब्ध करून देवयू शकत नाहीत.

## VIII)परिकल्पणा

१) अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पालकांना औपचारिक किंवा अनौपचारिक शिक्षणाच्या आधारे शिक्षित केल्यास माध्यमिक स्तरांवरील पाल्यांच्या किमान शैक्षणिक अडचणी दूर करू शकतील तसेच गरजेनुसार शैक्षणिक मार्गदर्शन.

२) अल्पभुधारक शेतक—यायंचे वार्षिक उत्पन्न प्रामुख्याने शेती व शेतीला पूरक जोडधंदे अशा व्यवसायाच्या माध्यमातून वाढल्यास ते आपल्या पाल्यांना अनिवार्य शैक्षणिक सुविधा देवू शेतील.

३) अल्पभूधारक शेतक—यांच्या पाल्यासाठी विविध योग्य शैक्षणिक उपक्रम शाळेत राबविल्यास त्याची शाळेत उपस्थिती वाढून होणा—या गळतीचे प्रमाण कमी करता येईल.

४) अल्पभूधारक शेतक—यांच्या पाल्यांना गणवेष,मोफत पाठयपुस्तके व वहया,माध्यान्ह भोजन, शिष्यवृत्ती व प्रोत्साहनपर पारितोषिके इ. चा लाभ मिळवून दिल्यास गळती रोखता येईल.

५) समाजातील विविध घटकांतून अल्पभूधारक शेतक—यांची पाल्ये दत्तक घेवून त्यांना शिक्षण दिल्यास गळतीचे प्रमाण निश्चितच कमी होईल.

## IX) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :—

१) प्रस्तूत संशोधन हे उदगीर तालूक्यातील आठ अनुदाणित मराठी माध्यमाच्या शाळेतील इ.९ वी तील अल्पभूधारक शेतक—यांच्या पाल्यांच्या गळतीची समस्या पुरतेच व्याप्त आहे.

२) प्रस्तूत संशोधन हे लातूर जिल्हयातील उदगीर तालुक्यातील मराठी माध्यमाच्या शाळा व शैक्षणिक वर्ष २०१० ते २०१२ पुरतेच मर्यादित आहे.

## X) संशोधन पध्दत :—

प्रस्तूत संशोधनामध्ये संशोधनाच्या असलेल्या तीन प्रमुख पध्दतीपैकी सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला.

## XI ) संशोधन साधने

प्रस्तूत संशोधनात संशोधकाने प्रश्नावली (मुख्याध्यापकांसाठी,शिक्षकांसाठी व विद्यार्थ्यासाठी) तसेच (मुलाखत (अल्पभूधारक शेतकरी) या संशोधन साधनाचा उपयोग केला.

## XII) जनसंख्या व नमूना निवड

संशोधकाने लॉटरी पध्दतीने उदगीर तालुक्यातील अनुदानित मराठी माध्यमांच्या १३० शाळापैकी ८ शाळा,त्या शाळेतील ४०० विद्यार्थ्यांपैकी २० टक्के विद्यार्थी म्हणजेच एकूण ८० विद्यार्थी तसेच २० शिक्षक व ८ मुख्याध्यापक यांची निवड केली.

**XIII)** माहिती संकलन,विश्लेषण व अर्धनिर्वचन संशोधकाने संकलित केलेल्या माहितीवरून विश्लेषण व अर्थनिर्वचन– पृथक्करण,कोष्टकीकरण व विषदीकरण याव्दारे केले आहे.

## XIV) संशोधनाचे निष्कर्ष

१) ९५ टक्के अल्पभूधारक शेतक–यांच्या ९ वी वर्गात शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अडचणी जाणवत होत्या

२) ९३ टक्के विद्यार्थ्यांना प्रगती साधण्यासाठी इंग्रजी व गणित या अवघड वाटणा–या विषयासाठी खाजगी शिकवणी लावावी असे वाटते. परंतू ९२ टक्के विद्यार्थी घरातील कौंटुंबिक व आर्थिक अडचणीमुळ खाजगी शिकवणी लावू शकत नव्हते.

३) ६४ टक्के मुलांना घरातील बिकट परिस्थितीमुळे घरच्या कामात मदत करावी लागते.

४) ६२ टक्के पालक विविध शालेय उपक्र्मामध्ये मलांना सहभाग नोंदवू देत नाहीत.

५) ६०टक्के अल्पभूधारक शेतक–यांची मुले मोफत पुस्तके वाटप योजनेमुळै दररोज शाळेत हजर रहात होती.

६) ५० टक्के अल्पभूधारक शेतकरी पालकांचे वार्षिक उत्पन्न रक्कम रूपये २५,०००/–पेक्षा कमी असल्यामूळे मुलांच्या शिक्षणाकडे प्रकर्षाने लक्ष देवू शकत नाहीत. त्यांना प्रामुख्यांने अर्थार्जनासाठी कामासाठी जावे लागते.

७) शाळेत अनेक उपक्रम व योजना राबवूनही ५० टक्के विद्यार्थी नियमित शाळेत उपस्थित राहत नाहीत.

८) ४७ टक्के अल्पभूधारक शेतक–यायंच्या पाल्यांना शिक्षण घ्यावे वाटते. पण आर्थिक अडचणीमुळे ते उदासीन बनतात व शिक्षणामध्ये वेळ वाया घालवू नये अशी त्यायंची धारणा बनते.

९) ४६ टक्के अल्पभूधारक शेतकरी निरक्षर असल्याने पाल्यांचा दैनंदिन अभ्यास घेवू शकत नाहीत.

१०) ४० टक्के अल्पभूधारक शेतक–यांची मुले सुटटीच्या दिवशी (व वेळ प्रसंगी )पालकांसोबत कामाला जातात.

११) ३७ टक्के अल्पभूधारक शेतकरी पालकांना आपली मुले शिकली पाहिजेत असे वाटत असल्याने त्यांना भेडसावणा–या विविध अडचणींवर मात करून आपल्या पाल्यांना जास्तीत जास्त शेक्षणिक साहित्य गरजेनुसार उपलब्ध करून देतात.

१२) अल्पभूधारक शेतक–यांमध्ये ५८ टक्के मजूरी करणा–या पालकांचे प्रमाण असल्याने ते आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे लक्ष देवू शकत नाहीत.

१३) २७ टक्के पालक त्यांच्या व्यवसासयातील कामासाठी मुलांना शाळत न पाठवल्याने विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढते.

१४) २५ टक्के अल्पभूधारक शेतक–यांच्या पाल्यांना शाळेला जाण्यासयाठी वाहनांची सोय नाही,त्यामूळे पायी जाणे अथवा मित्रांच्या सायकलवरून जाणे यामूळे शाळेत गैरहजर राहण्याकडे त्यांचा कल दिसवून येतो.

१५) ४० टक्के विद्यार्थी गुणवतावाढ योजनेत सहभाग नोंदवत नाहीत..

१६) शाळेत आयोजित केलेल्या पालक मेळाव्यात मध्यमवर्गीय व सुशिक्षित पालक सहभागी होतात.पण अल्पभूधारक शेतकरी सहीभागी होत नाहीत.

१७) भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या कलमानुसार ७ ते १४ वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांना शिक्षण सक्तीचे,सार्वत्रिक व मोफत आहे हे अनेक अल्पभूधारक शेतक–याना माहित नाही.

१८) ४० टक्के अल्पभूधारक शेतक–यांच्या कुटूंबामध्ये आर्थिक विवंचना,पोषक शैक्षणिक वातावरणाचा अभाव तसेच अशिक्षित पालकांमूळे त्यांच्याकडून मिळणारे अत्यल्प शैक्षणिक मार्गदर्शन यामूळे विद्यार्थी शाळेत अनुपस्थित राहतात.

## XV ) शिफारशी

**१)** अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पालकांना शिक्षणाने पाल्यांचा सर्वांगिण विकास साधता येते याची योग्य माहिती देवून त्याची जनजागृती करावी.

२) अल्पभूधारक शेतक–यांना शाळेत अनुपस्थित राहणा–या पाल्यांना दररोज शाळेत उपस्थित राहण्यासाठी पाठवण्याची सक्ती करावी.

३)अल्पभूधारक शेतक–यायंसाठी अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून प्रौढशिक्षण देवून पालकांना साक्षर केल्यास ते स्वत:च्या पाल्यांच्या अंभ्यासाकडे किमान लक्ष देतील.

४) शाळेत विद्यार्थ्यांसाठी निवासी वसतिगृहांची सोय असावी., जेणे करून बाहेर गावचे विद्यार्थी वसतिगृहाच्या आधारे शिक्षण घेतील व गळती कमी होईल.

५) आजूबाजूच्या भागातून येणा–या विद्यार्थ्यांसाठी निशुल्क अथवा सवलतीच्या दरात परिवहन योजनेची व्यवयस्था करावी.

६) विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी शाळेत सकस आहाराची / माध्यान्य भोजनाची सयोय करून द्यावी.

७) शाळेतील सहशिक्षकांनी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थितीची योग्य नोंद ठेवावी.

८) शाळेतील सर्व कर्मचा—यांनी शाळेत अनुपस्थित राहणा—या विद्याथ्यार्यंसाठी पालक भेट योजना राबवून त्यांच्याशी वैयक्तिक संपर्क करून अडचणींचे निराकरण करावे.

९) शाळेमध्ये प्रथम व व्दितिय सत्रात प्रत्येकी एका शिक्षक चालक मेळाव्याचे आयोजन करावे.

१०) समाजातील सामाजिक व सेवाभावी संस्था ,सामाजिक कार्यकर्ते,व्यावसायिक व दानशूर व्यक्ति यांनी अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील विद्यार्थी दत्तक घेवून त्यांच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी पार पाडावी.

## संदर्भग्रंथ सूची —

१ बापट भा.गो.(१९७५),शैक्षणिक संशोधन,नूतन प्रशाशन, पुणे

२ देशपांडे हेमलता (१९९४), शैक्षणिक संशोधन नूतन प्रकाशन ,पुणे

३ भिंताडे वि.रा.,शैक्षणिक संशोधन,नूतन प्रकाशन,पुणे